नि.फौ.ख.क्र.३२५/२०१९ .
सरकार वि. प्रभाकर
निशाणी क्र.२४.

## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांची साक्ष

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | :– | **दिवाकर रत्तूजी खोब्रागडे** |
| **वय** | :– | ५६ वर्षे, **धंदा** :– फोटोग्राफी, |
| **राहणार** | :– | कवठा, ता. सावनेर, जि. नागपूर. |

## सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्री.डी.आय.बारस्कर, विद्यमान सहाय्यक सरकारी वकील यांच्यामार्फत

फिर्यादी उज्वला ही माझी पत्नी आहे. मी आरोपी प्रभाकर खोब्रागडे हा माझा सख्खा भाऊ आहे. तो आज न्यायालयात हजर आहे. मला दोन मूली व एक मूलगा आहे. याव्यतिरीक्त माझ्या घरी माझी आई राहते.

२. घटना सन २०१९ च्या पावसाळ्यामध्ये घडली होती. त्यावेळी अंदाजे सायंकाळचे ४ वाजले होते, माझ्या घराचे बांधकाम चालू होते. बांधकामासाठी केळवद येथील दोन मजूर आलेले होते. आरोपी त्याठिकाणी आला व दिवार बांधू नको म्हणाला. मी त्याला ही जागा माझी आहे, मी दिवार बांधतो, असे म्हटले. त्यानंतर आरोपीने माझ्या डोक्यावर लोखंडी रॉड मारला. माझे डोके फूटले व रक्त वाहू लागले. त्यानंतर आम्ही पोलिस स्टेशनला गेलो असता तेथून आम्हाला सरकारी दवाखान्यात पाठविण्यात आले. सरकारी दवाखान्यात माझ्यावर उपचार करण्यात आले व तेथून पूढे त्यांनी मला नागपूरला पाठविले. मला मारहाण करण्यात आलेला लोखंडी रॉड दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला मूद्देमाल क्र.२५/२०२४ दाखविण्यात आला. हा तोच रॉड आहे. त्यास **वस्तू क्र.अ** देण्यात येते. पोलिसांनी घटनेविषयी माझ्याकडे चौकशी केली होती. केळवद येथील दवाखान्यात माझ्या जखमेला टाके मारण्यात आले. नागपूर येथील दवाखान्यात मशीनमध्ये माझे डोके तपासले होते.

## उलटतपास आरोपीतर्फे – श्री.सी.बी.सरोदे वकील यांच्यामार्फत

३. हे म्हणणे खरे आहे की, घटनेविषयी माझ्या पोरींना माहिती नाही, त्यावेळी त्या शाळेत गेल्या होत्या. घटनास्थळी लोक जमले होते किंवा काय हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांनी घराचा संपूर्ण हिस्सा मला दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सदर घरातील त्याचा हिस्सा मागत होता. हे म्हणणे खरे आहे की, मी व माझे वडील तो हिस्सा त्याला देण्यास नकार देत होतो. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, अर्ध्या हिश्यात

आरोपीच राहतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी राहत असलेला हिस्सा माझ्या काकाचा हिस्सा आहे व आम्ही राहत असलेला हिस्सा माझ्या वडीलांचा संपूर्ण हिस्सा आहे. हे म्हणणे खरे आहे की, घरासंबंधी आमचा आरोपीशी वाद सुरू होता. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा पूर्ण हिस्सा स्वत: गिळंकृत करण्याकरीता आम्ही आरोपीविरुद्ध खोटी केस केली. हे म्हणणे खरे नाही की, बांधकाम करतांना पडल्यामूळे मला जखम झाली होती व त्याचा फायदा घेऊन आम्ही आरोपीविरुद्ध खोटी केस दाखल केली. पोलिसांनी माझे बयाण कधी घेतले हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगीतल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही केवळ आरोपीला फसविण्याकरीता आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वस्तू क्र.अ हा मारलेला रॉड नाही व तो मी स्वत:च पोलिसांना दिला होता.

उलटतपास संपला.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृती
समक्ष

दिनांक –०६.०८.२०२४.

(श्रीमती एन.व्ही. रणवीर)
२ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,
सावनेर.